.. Panchayatana Arati ..

॥ पंचायतन आरती ॥

अघसंकटभयनाशन सुखदा विग्धेशा ।
आद्या सुरवरवंद्या नरवारण वेशा ॥
पाशांकुशधर सुंदर पुरवीसी आशा ।
निजवर देऊनि हरिसी भ्रांतीच्या पाशा ॥ ॥१॥

जय देव जय देव जय सुखकर मूर्ती ।
गणपति हरी शिवभास्कर अंबा सुखमूर्ती ॥ धृ ॥

पयसागरजाकांता धरणीधरशयना ।
करुणालय वारिसि भववारिजदलनयना ॥
गरुडध्वज भजन प्रिय पीतप्रभवसना ।
अनुदिनिं तव कीर्तनरस चाखो हे रसना ॥ जय ॥ २॥

नंदीवहना गहना पार्वतिच्या रमणा ।
मन्मथदहना शंभो वातातमजनयना ॥
सर्वोपाय विवर्जित तापत्रयशमना ।
कैलासाचलवासा करिसी सुरनमना ॥ जय ॥ ३॥

पद्मबोधकरणा नेत्रभ्रमहरणा ।
गोधन बंधनहरता द्योतक आचरणा ॥
किरण स्पर्शें वारिसि या तम आवरणा ।
शरणागत भयनाशन सुखवर्धनकरणा ॥ जय ॥ ४॥

त्रिभुवनउत्पति पालन करिसीइ तूं माया ।
नाहीं तुझिया रूपा दुसरी उपमा या ॥
तुझा गुणगणमहिमा न कळे निगमा या ।
करुणा करिसी अंबे मनविश्रामा ॥ जय ॥ ५॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 16, 1999